ॲडमिशन अपडेट

# 'नाटा-२०१७'साठी ऑनलाइन अर्ज उपलब्ध

हेमचंद्र शिंदे, बारामती

आर्किटेक्चरच्या पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या 'नाटा-२०१७' (नॅशनल ॲप्टिट्यूड टेस्ट इन आर्किटेक्चर) परीक्षेचे ऑनलाइन अर्ज www.nata.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. यावर्षी प्रथमच या परीक्षेच्या पद्धतीत बदल झाला असून देशभरातील विद्यार्थ्यांना १६ एप्रिल २०१७ रोजी फक्त एकदाच परीक्षा देता येणार आहे.

पूर्वी म्हणजे २०१६ पर्यंत नाटा परीक्षा जास्तीत जास्त पाच वेळा देता येत होती. त्यातून जास्तीत जास्त असलेला स्कोअर गृहीत धरला जात होता. हा स्कोअर दोन वर्षे वैध मानला जात होता. ही परीक्षा कौन्सिल ऑफ आर्किटेक्चरने मान्यता दिलेल्या देशभरातील केंद्र, महाविद्यालयांमध्ये दरवर्षी मार्च ते ऑगस्ट यादरम्यान घेतली जात होती.

### 'नाटा-२०१७'मधील बदल

'नाटा-२०१७' परीक्षा फक्त एकदाच देता येणार आहे. परीक्षा संपूर्णपणे ऑफलाइन पद्धतीने होणार आहे. तीन तासांच्या वेळात पहिल्या ९० मिनिटांमध्ये गणित व जनरल ॲप्टिट्यूड प्रत्येकी ३० प्रश्न व ६० गुण ही चार पर्यायांपैकी एक निवडा या पद्धतीने होईल. यानंतर त्वरित दुसऱ्या ९० मिनिटांमध्ये ए-४ आकाराच्या पेपरवर ड्राईंगचे दोन सेट प्रत्येकी ४० गुण असे ८० गुण (एकूण २०० गुण) अशी विभागणी राहील. यात नकारात्मक गुणदान पद्धत नाही. मात्र मेरिट क्रमांक देताना टायब्रेकरमध्ये कमी चुकीची उत्तरे नोंदविणाऱ्यांना प्राधान्य दिले जाते, याची नोंद घ्यावी. यापूर्वी असणारे आर्किटेक्चर प्रवेशासाठीचे बारावी व 'नाटा'चे ५०:५० भारांकन रद्द झाले असून सर्व प्रवेश 'नाटा' गुणांवर होणार आहेत.

### शैक्षणिक पात्रता

बारावी परीक्षा गणित विषय घेऊन उत्तीर्ण. कोणत्याही शाखेचा तसेच १० अधिक ३ वर्षांचा डिप्लोमा (किमान ५० टक्के गुणांसह) पात्रतेसाठी आवश्यक. प्रत्यक्ष प्रवेशासाठी नाटा- पात्रतेसाठी पहिल्या भागातील १२० पैकी ३० गुण व दुसऱ्या भागातील ड्रॉईंगमध्ये ८० पैकी २० गुण कमीत कमी असावेत.

**परीक्षा केंद्रे :** संपूर्ण देशभरात ६९ शहरांमध्ये परीक्षा होणार आहे. यामध्ये राज्यातील औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक व पुणे या शहरांचा समावेश आहे.

**अर्ज भरताना :** प्रथम माहितीपत्रक डाउनलोड करून अभ्यास करावा. परीक्षा शुल्क सर्वांसाठी १२५० रुपये असून क्रेडिट, डेबिट किंवा संकेतस्थळावरून डाउनलोड केलेल्या आयसीआयसीआय बँक चलनाद्वारे भरण्याची सोय आहे. फोटो, स्वाक्षरी तसेच डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा अपलोड करावयाचा असून त्यासाठी फाइलच्या आकाराकडे लक्ष देणे गरजेचे आहे. संकेतस्थळावरून अर्ज भरून झाल्यानंतर त्याची प्रिंट घ्यावी. ही प्रिंट पाठविण्याची आवश्यकता नाही.

**उपलब्ध जागा :** महाराष्ट्रामध्ये अनुदानित ३ संस्थांमध्ये २०७ जागा तसेच ७८ खासगी संस्थांमधील ५१०० जागा अशा एकूण ८१ संस्थांमधून ५३०७ जागा उपलब्ध होतील. नाटा परीक्षेच्या निकालानंतर प्राप्त होणाऱ्या मेरिट क्रमांकानुसार प्रवेश देण्यात येतील. संपूर्ण प्रवेश प्रक्रिया तंत्रशिक्षण विभागामार्फत राबविण्यात येईल.

### अत्यंत महत्त्वाचे

'नाटा-२०१७' देण्यासाठी ३१ जुलै २०१७ रोजी वयाची १७ वर्षे पूर्ण असण्याची अट आहे. त्यामुळे असंख्य विद्यार्थ्यांना अडचण येणार आहे. 'सीईटी'साठी १७ वर्षे वयाची अट असली तरी सर्व ठिकाणी वय ३१ डिसेंबर २०१७ पर्यंत मोजले जाते. हा नियम बदलण्याचे प्रयत्न सुरू आहेत, प्रतीक्षा करावी.

### वेळापत्रक

- **ऑनलाइन फॉर्म : ४ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०१७**
- **दुरुस्ती संधी : २० फेब्रुवारी ते २४ फेब्रुवारी २०१७**
- **ॲडमिट कार्ड डाउनलोडिंग : २६ मार्च २०१७**
- **परीक्षा : १६ एप्रिल २०१७**
- **निकाल : १० जून २०१७**